# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 20/03/2021 (शनिवार)

(सायंकाळ)

---

### देशी दारुची वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक
### स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

पो.स्टे. बोरी :– दिनांक 19/03/2021 चे 15.10 वा. दरम्यान पोस्टे. बोरी हद्दीत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पेट्रोलिंग करीत असतांना त्यांना गोपनीय माहिती मिळाली की, एक इसम हा अवैधरित्या देशी दारूची वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहितीवरून स्थानिक गुन्हे शाखेतील पथकाने बोरखेडी शिवार येथे नाकाबंदी लावून एमएच 40/बीजे 0732 क्रमांकाच्या मारोती सिलेरो कारला थांबवून तपासले असता त्यामध्ये आरोपी नामे– प्रमोद नागोराव काळे, वय 42 वर्ष, रा. राजीव नगर हिंगणा जि नागपुर याच्या ताब्यातुन 192 देशी दारू निपा किंमत 11520/– रू. चा माल मिळुन आला. आरोपीच्या ताब्यातुन वाहनासह एकुण कि. 4,11520/–रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे पोहवा गजेंद्र चौधरी, स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 65 (ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर आरोपीला ताब्यात घेवुन पुढील कार्यवाही करीता पो. स्टे. बोरी यांना देण्यात आले.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्री राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्री राहुल माकणीकर, पोलीस निरीक्षक श्री अनिल जिट्टावार स्था.गु.शा. यांचे मार्गदर्शनाखाली पोहवा गजेंद्र चौधरी, महेश जाधव, नापोशि रामा आडे, पोशि अमृत किनगे यांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर